दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com   संपादक : अजय भांगे   https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.६ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १८९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 6 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 189 | Pages 4 | Rate 4 Rs




# नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या सहकार्या मुळे घरवापसी:एकनाथ शिंदे यांनी मानले आभार



## पश्चिम आशियातून महाराष्ट्रियांची सुटका

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात वाढलेल्या संघर्षामुळे पश्चिम आशियात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असताना संयुक्त अरब अमिरातीत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्याअंतर्गत दोन विशेष उड्डाणांपैकी पहिले विमान मंगळवारी रात्री मुंबईत दाखल झाले. सुमारे ७० प्रवाशांना घेऊन हे विमान सुखरूप उतरल्याची माहिती शिवसेनेच्या आमदारांनी दिली.पश्चिम आशियातील संघर्षाची ठिणगी आठवड्याच्या शेवटी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर पडली. त्यानंतर इराणकडून प्रत्युत्तरात्मक कारवाई करण्यात आली. या घडामोडींमुळे संयुक्त अरब अमिरातीसह परिसरात तणाव वाढला होता. दुबई आणि फुजैरा परिसरात अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर त्यांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी विशेष उड्डाणांची व्यवस्था करण्यात आली.**

**मुंबई । प्रतिनिधी**

पहिले विमान रात्री ९ वाजून ४५ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे उतरले. या विमानाने सुमारे ७० प्रवासी मायदेशी परतले. या प्रवाशांचे स्वागत करण्यासाठी शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल, दिलीप लांडे आणि मंगेश कुडाळकर विमानतळावर उपस्थित होते. त्यांनी परतलेल्या नागरिकांची विचारपूस केली आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. प्रवाशांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि आनंद स्पष्ट दिसत होता.या मोहिमेबाबत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, दुबईत अडकलेल्या महाराष्ट्रातील अनेक नागरिकांना मायदेशी परत आणण्यात आज यश मिळाले आहे. फुजैरा विमानतळावरून निघालेले प्रवासी सुखरूप मुंबईत पोहोचले, ही मोठी दिलासादायक बाब आहे. त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे सहकार्य मिळाल्यामुळे ही 'घरवापसी' शक्य झाल्याचे नमूद केले.या संघर्षामुळे परदेशात अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांमध्ये मोठी चिंता होती. सततच्या बातम्या आणि वाढत्या तणावामुळे मानसिक तणावही वाढला होता. अशा वेळी राज्य सरकारने वेगाने हालचाल करत विशेष उड्डाणांची व्यवस्था केली. पहिल्या उड्डाणाने प्रवाशांना सुरक्षित आणल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. उर्वरित प्रवाशांसाठीही दुसऱ्या उड्डाणाची तयारी सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासन, स्थानिक प्रतिनिधी आणि केंद्र सरकार यांचा समन्वय महत्त्वाचा ठरला. संकटाच्या काळात अडकलेल्या नागरिकांना वेळेवर मदत पोहोचवणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. पहिल्या उड्डाणाच्या यशानंतर दुसऱ्या उड्डाणाकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. पश्चिम आशियातील परिस्थिती अजूनही संवेदनशील असली तरी महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित परत आणण्याचे प्रयत्न सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

---

# भाजपा नेते बदामराव पंडितांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय गौराई कला महोत्सवाचे आयोजन

## १५ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री, भाजपा नेते बदामराव पंडित यांचा वाढदिवस ३ मे २०२६ रोजी असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराईत, स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराईच्या वतीने जिल्हास्तरीय गौराई कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी १५ मार्च २०२६ पर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त सचिव रामदास कोकाटे आणि अध्यक्ष सिद्धेश्वरी कोकाटे यांनी केले आहे.

स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराई यांच्या वतीने गेल्या पाच वर्षापासून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केला जाणारा गौराई कला महोत्सव यावर्षी दिनांक २०, २१ आणि २२ मार्च




२०२६ रोजी होणार आहे. गेवराई नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक व शॉपिंग सेंटर येथे होणाऱ्या या महोत्सवात विविध स्पर्धांची व शास्त्रीय गायनाची मेजवानी गेवराईकरांना मिळणार आहे. या स्पर्धांमध्ये शालेय स्तर आणि वैयक्तिक स्तरावर विविध गटांमध्ये चित्रकला, निबंध, समूहगीत गायन, शास्त्रीय गीत गायन आणि समूह नृत्य आदी स्पर्धांचे नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील यशस्वी कलावंतांसाठी सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व आकर्षक बक्षीसही ठेवण्यात आलेले आहेत. गौराई कला महोत्सवाचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावं हा असून, या महोत्सवात व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सिद्धेश्वरी रामदास कोकाटे अध्यक्ष स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराई मोबाईल क्रमांक-७४९८७२८३१३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने संस्थेचे सचिव रामदास कोकाटे यांनी केले आहे.

---

# बामणी फाटा,परीसरात खुलेआम गुटखा विक्री अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील बामणी फाटा परीसरात राजरोसपणे अवैध गुटख्याची वाहनाद्वारे आयात करून ग्रामीण भागात जीवघेण्या गुटखा व सुगंधीत तंबाखू ची खुलेआम विक्री सुरू आहे. या अवैध धंद्यात दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे अन्न व औषध प्रशासन धृतराष्ट्राची भूमिका घेत गुटखा तस्कर यांची पाठराखण करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे.ईतर शहरातुन चार चाकी च्या माध्यमातून बामणी फाटा व परीसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची सकाळी तीन ते चारच्या सुमारास आयात केली जात आहे. हदगाव ठिकाणावरून तालुक्यातील ग्रामीण भागात गुटखा पोहोचविला जातो. तालुक्यात ग्रामीण भागातील सर्वच किराणा दुकानात, कॅन्टींग पान टपरी धारकाच्या दुकानासमोर गुटखा तस्कर मोटरसायकल उभी करून त्यांना गुटका व सुगंधीत तंबाखू पोहोचवीत व



दर्शनी भागात गुटख्याची माळ लावून राजरोसपणे विक्री केल्या जाते. अन्न व औषध प्रशासन विभाग कारवाई करण्यास का धजावत नाही हा जनतेपुढे पडलेला मोठा प्रश्न आहे.गुटख्यात मॅग्नेशियम कार्बोनेट सारख्या घातक घटकांमुळे कर्करोगासारख्या गंभीर आजार होण्याची शक्यता सुद्धा आहे तंबाखूजन्य पदार्थामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडू नये यासाठी राज्य सरकारने २०१२ मध्ये गुटख्याच्या तंबाखूजन्य सुपारी पान मसाल्याच्या पदार्थाची निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातली आहे.तरी सुद्धा बामणी फाटा परीसरात राजरोसपणे खुलेआम बंदी असलेला गुटखा व सुगंधीत तंबाखू विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. तरी संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन अवैधरित्या गुटखा विक्रेत्यांवर कडक कारवाई करावी असी सामान्य जनतेची मागणी आहे.

---

# हरकत असेल तर तक्रार करा, पण बाप काढणे योग्य नाही:विधिमंडळाच्या पोर्चमध्ये आमदार जाधव-कल्याणशेट्टींमध्ये शब्दयुद्ध

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईत सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना मंगळवारी आणखी एक नवा वाद समोर आला. आमदार सचिन कल्यणाशेट्टी आणि आमदार भास्कर जाधव यांच्यात विधिमंडळ परिसरातच जोरदार शाब्दिक चकमक झाली. विधानसभा इमारतीच्या पोर्चमध्ये दोन्ही आमदार आमनेसामने आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तुम्ही बाप का काढला? या प्रश्नावरून हा वाद चांगलाच रंगला. उपस्थित आमदार, कर्मचारी आणि कार्यकर्त्यांसमोर झालेल्या या बाचाबाचीमुळे अधिवेशनाच्या चर्चांना वेगळे वळण मिळाले.
सध्या सुरू असलेले बजेट सेशन विविध मुद्द्यांमुळे वादग्रस्त ठरत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भातील संशय, तसेच इतर राजकीय घडामोडींमुळे सभागृहात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यातच हा नवा वाद उफाळून आला. माहितीप्रमाणे, विधानसभा आमदार राहुल आवाडे यांची मुलगी सानिका आणि राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे चिरंजीव अजय यांच्या विवाहसोहळ्याची पत्रिका आमदारांच्या खासगी सहाय्यकांकडून विधिमंडळ परिसरात वाटली जात होती. एकाच ठिकाणी सर्व सदस्य उपस्थित असल्याने सोयीसाठी हे वाटप सुरू होते.याच पत्रिका वाटपावरून नाराजी व्यक्त करताना भास्कर जाधव यांनी तीव्र शब्दांत टीका केल्याचे सांगितले जाते. विधिमंडळ आवारात अशा प्रकारे पत्रिका वाटणे योग्य नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. या चर्चेदरम्यान जाधव यांच्या बोलण्यात सरकारचा बाप, असा उल्लेख झाल्याचा आरोप सचिन कल्याणशेट्टी यांनी केला. हा शब्दप्रयोग ऐकताच कल्याणशेट्टी संतापले आणि त्यांनी जाधवांना थेट जाब विचारला. तुम्ही बाप काढलाय, तुम्हाला तो अधिकार आहे का? तुम्ही ज्येष्ठ सदस्य आहात. तुम्ही बाप काढला तर मीही काढेल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटल्याची माहिती समोर आली आहे.या प्रश्नावर भास्कर जाधव यांनीही तितक्याच ठामपणे उत्तर दिले. तुम्हाला माझा बाप काढायचा असेल तर काढा, असे प्रत्युत्तर त्यांनी दिल्याचे सांगितले जाते. दोन्ही आमदारांमधील ही शाब्दिक देवाणघेवाण काही काळ सुरू राहिली. परिसरात उपस्थित असलेल्या सदस्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला.

---

# राज्यसभा बिनविरोध होईल असे दिसतंय:शरद पवारांना पाठिंबा दिल्याबद्दल ठाकरेंचे आभार-सुप्रिया सुळे

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत महाराष्ट्राच्या राजकारणातील 'संस्कृती' आणि 'सौहार्द' पुन्हा एकदा अधोरेखित होताना दिसत आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे आभार मानण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे आज संध्याकाळी साडेसहा वाजता 'मातोश्री'वर जाणार आहेत.राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस होता. भाजपकडून ४, शिवसेना शिंदे सेनेकडून १, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून १ तर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सात जागेंसाठी सातच अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोधी होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. शरद पवारांचा उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधत सर्वांचे आभार मानले.

ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी ट्वीट केले होते की, शिवसेनेने अजुनही राज्यसभेची जागा सोडलेली नाही. त्यात ते आज शरद पवार यांचा उमेदवारी अर्ज भरतानाही उपस्थित नव्हते. याबाबत सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या, आज सगळे सचिन तेंडूलकर यांच्याकडील लग्नाला उपस्थित आहेत. मी परवा उद्धव ठाकरेंना भेटायला गेले होते. आज संध्याकाळी साडेसहा वाजता पुन्हा ठाकरे कुटुंबाला भेटायला मातोश्रीवर जाणार आहे. शरद पवारांना राज्यसभेसाठी पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणार आहे.यावेळी माध्यमांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे भावूक झाल्या. आमची ही नाती गेली सहा दशके प्रेमाची आहेत. २००६ मध्ये मी जेव्हा पहिल्यांदा राज्यसभेत गेले होते, तेव्हा आदरणीय बाळासाहेब ठाकरे हयात होते आणि माझी निवडणूक बिनविरोध झाली होती. आज २० वर्षांनंतर बाळासाहेब आपल्यात नाहीत, पण शिवसेना आणि काँग्रेसने दाखवलेली ही समंजस भूमिका म्हणजे महाराष्ट्राची खरी 'आण-बाण-शान' आहे, असे त्या म्हणाल्या. यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्रात विरोधक हा शत्रू नसून वैचारिक लढाई असते, हीच संस्कृती जपण्याचा प्रयत्न सर्व पक्ष करत असल्याचे त्यांनी नमूद केले.शरद पवार यांच्या उमेदवारीला केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशपातळीवरूनही पाठिंबा मिळत आहे. कालच माझे अखिलेश यादव यांच्याशी बोलणे झाले, त्यांनीही सहकार्याची भूमिका मांडली. कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी आणि ज्यांनी गेल्या ६० वर्षांपासून पवारांना साथ दिली, ते सर्व आज आमच्यासोबत उभे आहेत, असे सांगत सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडी आणि 'इंडिया' (खछऊख-) अलायन्सचे आभार मानले.याच निवडणुकीत अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे पहिल्यांदाच राज्यसभेवर जात आहेत. आत्या म्हणून पार्थला काय सल्ला द्याल? या प्रश्नावर सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांनी दिलेला कानमंत्र सांगितला. लोकसभा किंवा राज्यसभेत गेल्यानंतर कान उघडे ठेवावेत आणि कमी बोलावे. जेव्हा संधी मिळेल तेव्हा अत्यंत अभ्यासपूर्णच बोलावे. कारण तिथे बसलेला प्रत्येक व्यक्ती आपल्यापेक्षा जास्त जाणकार असतो आणि संपूर्ण देश आपल्याकडे बघत असतो, असा मोलाचा सल्ला सुप्रिया सुळे यांनी पार्थ पवारांना दिला.उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अपघात प्रकरणी व्हीएसआर कंपनीच्या मालकाची आज सीआयडीने चौकशी केली. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, अजितदादांवर प्रेम करणारी सर्वच जनता अस्वस्थ आहे. त्यामुळे अजितदादांच्या अपघाताचा पारदर्शक तपास व्हावा अशी सर्वांचीच मागणी आहे. यावर वारंवार रोहित पवारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत, तसेच जय पवारांनीही त्यावर भाष्य केले आहे. त्यामुळे अजित पवारांच्या अपघाताची पारदर्शच चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

# संपादकीय

## कार्बन जिरवा, कार्बन मुरवा...

हरितगृह वायूंच्या उत्सर्गामुळे मानवी आरोग्याला धोका उद्भवत नाही, अशी भूमिका अलीकडेच घेणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकीकडे आणि आयात उत्पादनांवर कार्बनकर लावणारा युरोप दुसरीकडे. ग्रीनलंडमधील तीन–तीन किलोमीटर उंचीच्या हिमशिखरांखाली दडलेल्या खनिज साधनसंपत्तीतून आपले उखळ पांढरे कसे होईल, याचे डावपेच आखण्यात मग्न असणारे ट्रम्प एकीकडे आणि ती हिमशिखरे वितळून जागतिक पर्यावरण धोक्यात येईल, याची चिंता करणारे जग दुसरीकडे... अशा दोन टोकांच्या धारणा आणि धोरणे यांना सामोरे जात आपण सर्व हवामान बदलांच्या संकटांचा मुकाबला करत आहोत. हा विषय जेवढा चिंतेचा आणि तातडीचा, तेवढी त्यावरील कृती मात्र तीव्र आणि व्यापक राहिली नसल्याने उद्याच्या विकासवाटांभोवती प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत.

हवामान बदलांच्या समस्येचे गांभीर्य आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहे. औद्योगीकरणपूर्व स्तरापेक्षा जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसहून अधिक होऊ नये, असे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट घेऊन या समस्येचा जग मुकाबला करू पाहात आहे. त्यासाठी इ.स. २०५०पर्यंत कर्बभाररहित स्थिती (नेट झिरो) गाठण्याचे सर्व देशांनी मान्यही केले आहे. भारताने इ.स. २०७०चे उद्दिष्ट ठेवले आहे. प्रत्यक्षात मात्र २०२४मधील सरासरी जागतिक तापमान हे औद्योगीकरणपूर्व स्तरापेक्षा १.६० अंश सेल्सिअसने, तर २०२५मध्ये ते १.४७ अंश सेल्सिअसने अधिक होते. म्हणजे जग ज्याकडे भविष्यातील धोका म्हणून पाहात आहे, त्या उंबरठ्यावर तर आपण सामूहिक अनास्थेतून पोचलोही आहोत!

**चार पदरी उपाययोजनेची गरज**

या पार्श्वभूमीवर, विकसित देशांकडून अपेक्षित मदतीची वाट न पाहता भारत एका जबाबदार देशाची भूमिका पार पाडत आहे. ही वाटचाल चार मार्गांनी करावी लागणार आहे.

ऊर्जा संक्रमण : प्रत्येकाला सहज सुचणारा आणि जगाने स्वीकारलेला हा स्वाभाविक मार्ग आहे. हरितगृह वायूंचा उत्सर्ग वाढवणाऱ्या खनिज ऊर्जेपासून दूर जाऊन स्वच्छ अशा सौर, पवन, आण्विक किंवा हायड्रोजन अशा पर्यायांकडे वळणे त्यात अपेक्षित आहे.

वनीकरण : झाडे कार्बन डायऑक्साइड हवेतून शोषतात आणि कर्बशोषणाचा सर्वाधिक जुना व नैसर्गिक स्रोत म्हणून मानवसमाजाच्या मदतीला धावून येतात, हे सर्वज्ञात आहे. असे हरित आच्छादन वाढवून अडीच ते तीन अब्ज टनांनी कर्बशोषणाची क्षमता वाढवण्याचे भारताने २०३०पर्यंतचे उद्दिष्ट ठेवले आहे.

चक्रीय अर्थव्यवस्था : वापरा आणि फेकून द्या, हा मार्ग न पत्करता रीड्यूस, रीयूज, रिसायकल या चक्रीय व्यवस्थेचा स्वीकार हा जागतिक प्रदूषणातील वाटा कमी करणारा ठरू शकतो. आपले सरकारही मिशन लाइफ (लाइफस्टाइल फॉर एनव्हायरन्मेंट) या उपकमातून त्याला प्रोत्साहन देत आहे.

कर्बशोषण आणि विलगीकरण : आधीचे तीनही मार्ग कर्बोत्सर्ग कमी करण्यावर भर देतात, त्याजोडीला होणारा कर्बोत्सर्ग शोषून नक्त कर्बभार कमी करण्यासाठी हा मार्ग उपाय सुचवतो. विशेषतः औद्योगिक प्रकल्पांच्या चिमण्यांमधून बाहेर पडणारा धूर शोषून त्याचे द्रवात रूपांतर करणे आणि त्यापासून खते, कृत्रिम इंधने आणि हरित काँक्रिट तयार करणे किंवा जमिनीत खोलवरच्या वापरबाह्य झालेल्या तेलविहिरींत किंवा खडकांमध्ये ते साठवून विल्हेवाट लावणे असे उपाय करता येतात.

**कर्बशोषण प्रकल्पांसाठी ठोस तरतूद**

कर्बशोषण, कर्बरूपांतर आणि कर्बोपयोजन यांसाठी भारत आता खात्रीशीर पावले उचलू लागला आहे. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात त्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी वीस हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यांपैकी पाचशे कोटी रुपये आगामी आर्थिक वर्षात ऊर्जा मंत्रालयाच्या यासंबंधीच्या पथदर्शी प्रकल्पासाठी वापरले जातील. पोलाद, सिमेंट, शोधन प्रकल्प, रसायने आणि ऊर्जा या क्षेत्रांसाठी या निधीचा प्राधान्याने विनियोग केला जाईल. कर्बशोषणाच्या या प्रकल्पांची सुरुवात गुजरात आणि ओडिशा या राज्यांतील औद्योगिक वसाहतींमध्ये समाईक पायाभूत सोयींच्या उभारणीतून केली जाईल. या व्यवस्थांची उभारणी स्वतः करण्याऐवजी खासगी क्षेत्रातून करून घेण्याकडे सरकारने लक्ष वळवले आहे. परंतु त्यातील आर्थिक व्यवहार्यतेवर सरकार लक्ष ठेवेल आणि जेथे तो बोजा अतिरिक्त होईल, तेथे सरकार निधी (व्हाएबिलिटी गॅप फंडिंग) पुरवेल.

कर्बशोषणाच्या उपाययोजना सरकारच्या विषयपत्रिकेवर असल्या, तरी त्यांना चालना मिळण्यास युरोपातील एक ताजा निर्णय महत्त्वाचे कारण ठरला आहे. युरोपीय महासंघाने आयात मालासाठी कार्बन सीमा समायोजन व्यवस्था या नावाखाली १ जानेवारी २०२६पासून कर्बशुल्क लागू केले आहे. पोलाद उत्पादक याचे बळी ठरू शकतात, ही शक्यता गृहीत धरून भारताने ओमानसोबत व्यापार करार करून त्या देशाची दारे भारतीय पोलाद उत्पादकांना खुली केली आहेत.या प्रयत्नातून नवी कर्बअर्थव्यवस्थाही उभी राहणार आहे. हवामान बदल रोखण्यासाठीची उद्दिष्टे गाठतानाही आपल्याला कोळशावर आधारित आणि अन्य काही प्रदूषणकारी औद्योगिक प्रकल्प पूर्ण गुंडाळून ठेवता येणार नाहीत. कर्बशोषणाच्या उपायांमुळे हे प्रकल्प देशाच्या जीडीपीमध्येही भर घालत राहतील आणि रोजगारनिर्मितीमध्येही. अशीच रोजगारनिर्मिती ही कर्बशोषणाच्या उपाययोजनांतून थेट स्वरूपात होऊ लागेल. नीती आयोगाच्या अंदाजानुसार, या क्षेत्रात इ.स. २०५०पर्यंत ८० लाख ते एक कोटी नवे रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. कर्बरूपांतर हादेखील ही समस्या कमी करण्याचा एक मार्ग आहे. त्यामध्ये कार्बन डायऑक्साइडपासून कृत्रिम इंधन व मिथेनॉलसारखी रसायने यांची निर्मिती करता येते. त्या मार्गाने आपण खनिज इंधनांवरील, विशेषतः ती आयात करण्यावरील आपले अवलंबित्वही कमी करू शकतो. हवामान बदल रोखण्यासाठी कर्बशोषण, रूपांतर आणि उपयोजनाचा हा मार्ग खुला होत असला तरी अद्याप तो प्रस्थापित झालेला नाही. एक तर तो खर्चिक आहे. दुसरे म्हणजे त्यासाठीचे प्रकल्प चालवण्यासाठीही ऊर्जेची गरज भासते आणि महत्त्वाचे म्हणजे शोषलेल्या कर्बसाठ्याचा जमिनीखाली निचरा करायचा असेल तर त्याची नेमकी माहिती देणारे अद्ययावत नकाशे उपलब्ध होणे गरजेचे आहे. हरित भवितव्य साकारण्यातील अडसर एवढ्यापुरतेच मर्यादित नाहीत. नीती आयोगाने अलीकडेच प्रकाशित केलेल्या 'सिनारिओज टोवर्ड्स विकसित भारत अँड नेट झिरो' या शीर्षकाच्या अहवालानुसार, 'नेट झिरो' गाठण्यासाठी भारताला इ.स. २०७०पर्यंत २२.७ सहस्राब्ज डॉलर एवढ्या महाकाय गुंतवणुकीची गरज भासणार आहे. त्यांपैकी १.४ सहस्राब्ज डॉलर एवढी गुंतवणूक फक्त कर्बशोषण, रूपांतर आणि उपयोजन यांसाठी लागणार आहे. त्यासाठी वीस हजार कोटी रुपयांपासून आपण सुरुवात केली आहे. म्हणजे खरे तर पुढील ४५ वर्षांतील गरजेच्या एक टक्का एवढीही तरतूद आपण पुढील पाच वर्षांसाठी केलेली नाही. परंतु, ही फक्त केंद्र सरकारने किंवा एकट्या भारताने लढण्याची लढाई नाही. सरकारने केलेल्या तरतुदीकडे केवळ पहिले पाऊल म्हणून पाहण्याची गरज आहे. त्याला सामूहिक इच्छाशक्तीचे पाठबळ मिळू लागले तर या समस्येतून बाहेर पडण्याचे आणखी मार्ग समोर येतील. फक्त गरज आहे ती अर्थस्वार्थ बाजूला ठेवून मोकळा श्वास कसा घेता येईल, याचा विचार करण्याची.

# होळीनंतर मोलगीत येथे अग्रीदेवतेची विशेष पूजा

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**



होळी व मेलादा उत्सव साजरा झाल्यानंतर मोलगी ता. अक्कलकुवा येथे गावाच्या मानलेल्या चुलीच्या ठिकाणी अग्री देवतेची पुजेचा उपक्रम राबविण्यात आला. या पुजेसाठी गावातील मान्यवर व ज्येष्ठ नागरिक उपस्थिती होते. त्यांच्या सहभागातून अन्य उपक्रम राबविले. मोलगी येथील बहुतांश बांधव नोकरी व कामंधंद्यानिमित्त बाहेरगावी गेले आहे.त्यापैकी काही बांधवांना होळी व मेलादा उत्सवात काही कारणास्तव सहभागी होता आले नाही. होळी पेटल्यानंतरही उशिरा येणाऱ्या बांधवांकडून होळीची पूजा उशिरानेच करण्यात आली. परंतु होळीच्या पाश्वभूमीवर मोलगी येथे घेण्यात येणारा अग्री देवता पूजेच्या उपक्रमात हे हे बांधव निश्वतच सहभागी झाले. होळीनिमित्त होणारी ही पूजा देखील होळी व मेलादा इतकीच महत्वाची असल्याने या बांधवांच्या उपस्थितीत ही पूजा करण्यात आली. या पजे दरम्यान मोलगीचे पोलीस पाटील रतनसिंग वसावे, इंजि.बाजीराव पाडवी, अॅड सरदारसिंग वसावे, रुपसिंग वसावे,मधुकर वसावे,तानाजी वसावे,चंद्रसिंग वसावे,निमजी वसावे, सागर वसावे, कालुसिंग वसावे, रामसिंग वसावे,उग्राण्या वसावे, धनसिंग वसावे, भिमसिंग वसावे,विजय वसावे,दामा वसावे,गुलाबसिंग वसावे,विजय वसावे ,सुनील वळवी,अरुण वसावे, हिरालाल वसावे, आपसिंग वसावे, सुरेश वसावे,कालुसिंग वसावे, धनसिंग वसावे,दित्या वसावे,जतनसिंग वळवी,जेकमसिंग वळवी आदी उपस्थित होते. ही पूजा गावपुजारी नुरजी वसावे, रोता वसावे, दमण्या वळवी पुंजारा व विज्या वसावे पुंजारा यांच्या हस्ते करण्यात आली.

**होळीप्रमाणेच महत्वाची पूजा**

मोलगी येते होलीकोत्सवनिमित्त होळी, मेलादा व अग्री देवतेची पूजा करण्याची परंपरा आहे. ही पूजा होळी संपल्यानंतर करण्यात येत असली तरी त्याला होळीसारखेच मोठे महत्व दिले जाते. त्यामुळे या पुजेसाठी देखील गावपंचायतीसह शेजारील गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थिती नोंदवत आहे.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. ५ ते १२ मार्च २०२६ दरम्यान आरोग्य सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या आरोग्य सप्ताहामध्ये मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मोफत आरोग्यसेवा देण्यासाठी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर येथील डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील उपस्थित राहणार आहेत. दि. १० मार्च रोजी परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर माली पारगाव येथे होणाऱ्या महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी गुरुपुत्र युवासंत आदरणीय चंद्रकांत (दादासाहेब) मोरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी महा सत्संग आरोग्य मेळाव्यातून चंद्रकांत मोरे यांचे अमृततुल्य हितगुज, आरोग्य, अध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी विषयांव अनमोल मार्गदर्शन लाभणार आहे. यानंतर याठिकाणी कॅन्सर, हार्निया, गर्भाशयाचे आजार, पित्ताशयाचे, हायड्रोसील, अपेंडिक्स, अन्जियोप्लास्टी, हाडांच्या शस्त्रक्रिया, सांधे विकार, पंचकर्म, फिजिओथेरपी, वात, कफ, पित्त, अर्धांगवायू, मनक्याचे विकार, कान, नाक व घसा, मधुमेह, रक्तदाब, यासह सर्व आजारांची तपासणी केली जाणार असून, आयुष्मान भारत या योजनेत पात्र असणारे रुग्णांचे मोफत ऑपरेशन करून दिले जाणार आहेत. पात्र नसलेल्या परंतु शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून दिली जाईल मेडिकलचा व लॅबचा खर्च वैयक्तिक करावा. माजलगाव तालुक्यातील सर्व ठिकाणी होणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी शिबीरांचा बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने केले आहे.

# डॉ.शेख रुखसाना अजीजसाहब राष्ट्रीय उच्च शिक्षण शिखर परिषद पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील केसापूरी वसाहत येथील रहिवासी तसेच छत्रपती संभाजीनगर येथील बी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख रुखसाना अजीजसाहब यांना राष्ट्रीय उच्च शिक्षण शिखर परिषद पुरस्कार – २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना 'वर्षातील उत्कृष्ट संशोधक – २०२६' या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.



उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तावृद्धी, संशोधन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कार्य, शैक्षणिक व्यवस्थापनातील नेतृत्व तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांना हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान प्रदान केला जातो. शिक्षण व संशोधन क्षेत्रात डॉ. शेख रुखसाना अजीजसाहब यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

डॉ. रुखसाना अजीजसाहब यांनी शिक्षक शिक्षण क्षेत्रात अनेक संशोधनपर उपक्रम राबवले असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध शैक्षणिक प्रकल्प आणि प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जातही लक्षणीय वाढ झाली आहे.या यशाबद्दल डॉ. शेख मेहराज अजीजसाहब (आयुक्त, कृषी मंत्रालय), संस्थेचे अध्यक्ष अॅड. सुफियान सिद्दीकी, शेख अजीज महेबूबसाब, शेख काफियाबी अजीजसाहब, शेख राजीया मेहराज, डॉ. सोहेल जकीयोदिन, प्रा. मुमतहीन सिद्दीकी, डॉ. शेख सुभान हसन, लतीफ रशीद बागवान, हमीद रशीद बागवान तसेच शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# होळीनंतर आता 'गेर नृत्या' ने भरला उत्साह

## सातपुड्यातील हजारो भाविकांची उपस्थिती; १४ मार्च रोजी शिर्वे येथे होणार समारोप,११ गावांमध्ये आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यात सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या सोजदान येथे याहा डिंडन देवीच्या पारंपारिक गेर नृत्याचा आज धुलीवंदनाला शुभारंभ झाला असून सातपुड्यातील हजारो भाविकांनी हे नृत्य पाहण्यासाठी हजेरी लावली या नृत्याने सातपुड्याच्या पायथ्याशी भावनिक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले पारंपारिक अनोख्या पद्धतीचे हे दिंडन नृत्य सुरू होण्याआधी शेकडो भाविकांनी पारंपारिक कठोर व्रत केले आहे. कडाक्याच्या उन्हात पारंपारिक वेशभूषेत बांसुरी च्या तालावर अनवाणी केले जाणारे नृत्य विशेष आकर्षणीय आहे हे नृत्य एक वर्ष खंड करून पुढील वर्षी आयोजित करण्याची परंपरा आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी सरपंच भूपेंद्र पाडवी , किसन नाईक, जयमल पाडवी, गणपत पाडवी, कुवरसिंग पाडवी, रणजीत पाडवी, रमेश पाडवी, विजयसिंग पाडवी सर्वरसिंग पाडवी, इंद्रसिंग पाडवी आदींसह परिसरातील आजी– माजी सरपंच तसेच पोलीस पाटील आदींचे योगदान आहे.



कार्यक्रमास खासदार एड. गोवाल पाडवी आमदार आमश्या पाडवी माजी मंत्री एड. के. सी. पाडवी एड. पद्माकर वळवी माजी जि. प. सभापती सुहास नाईक जि. प. सदस्य जितेंद्र पाडवी यांच्यासह जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधींनी भेट दिली.

अक्कलकुवा तालुक्यातील नवलपुर संस्थानिकांनी सन १८३४– १८३५ पासून हे गेर नृत्य सुरू केले असून संस्थानिकांचे वंशज कुवरसिंह तापसिंह पाडवी व जगतसिंग गटवरसिंग पाडवी यांनी पुढे सुरू ठेवली असून गणपतसिंग जवरसिंग पाडवी, अरुणसिंग सुरेंद्रसिंग पाडवी, प्रेमसिंग सुमेरसिंग पाडवी ,कुंवरसिंग जवरसिंग पाडवी, रणजीतसिंग गटवरसिंग पाडवी हे मुख्य आयोजक आहेत.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२० रोजी गिंब देवाचे विधीवत पारंपारिक पूजन करून दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी गादीची स्थापना झाली. दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ पासून नृत्यात सहभागी होणारी मुले पारंपारिक मुलींच्या वेशभूषेत सहभागी होऊन नृत्याचा सराव १ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन मुख्य पुजारी संमिश्रा जेरमा वरती, विजयसिंग मांगा वळवी यांचे मार्गदर्शन असून मोरखी जयसिंग खात्या पाडवी बोंबाड्या अर्थात नृत्य शिकवणारा जेमू नुरज्या पाडवी नगाऱ्या अर्थात नगारा वाजवणारा रामसिंग नवल्या पाडवी बांसरी अर्थात पावी वादक निलेश गिंबल्या वळवी मांदल वाजवणारा जगन रेसा पाडवी ताट वाजवणारा रवींद्र रामसिंग पाडवी यांचा सहभाग आहे.

हे गेरनृत्य पुढील अकरा गावात मध्ये आयोजित होणार असून दिनांक ४ मार्च २०२६ रोजी अलीविहीर ५ मार्च रोजी मौलीपाडा ६ मार्च रतनपाडा ७ मार्च नाला वडफडी आठ मार्च रामपूर ९ मार्च राज मोही मोठी १० मार्च तोरंदा (गुजरात) ११ मार्च सतोना १२ मार्च मोदलपाडा १३ मार्च पाटडी १४ मार्च रोजी शिर्वे येथे या नृत्याचा समारोप होणार आहे सर्व नृत्यात सहभागी मुलींच्या वेश परिधान केलेली मुले एकधड येथे येऊन त्यांच्या गळ्यातील माळ( पोत )सोडून ते मोकळे होतील या नृत्यात ४२१ मुलींच्या वेशातील मुलांचा समावेश आहे या नृत्यात पाच वर्षापासून बालवृत्त सहभागी होऊ शकतात.

धुलीवंदनापासून सुरू होणारे याहा डिंडन देवीचे गेर नृत्य सातपुड्यातील पारंपारिक संस्कृतीचा अनोखा ठेवा असून कठोर व्रत करून होणारे बांसुरीच्या सुरांवरील गेरनृत्य सातपुड्यात भावनिक वातावरण निर्माण करून चैतन्य निर्माण करते ते पाहण्यासाठी हजारो भाविक हजेरी लावत असून जिल्ह्यासह राज्यातील भाविकांनी या जतन केलेल्या अनोख्या संस्कृतीचे दर्शन जिल्हा सह राज्यातील नागरिकांनी घेतले पाहिजे अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी यांनी यावेळी व्यक्त केली.

# महाड येथे चवदार तळे सत्याग्रह दिनी अनुयायांसाठी योग्य निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्या– अण्णा बनसोडे, उपाध्यक्ष विधानसभा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त २० मार्च रोजी महाड येथे येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी योग्य निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी प्रशासनाला दिल्या. विधानभवन येथील कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत आढावा बैठक पार पडली.या बैठकीस रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री तसेच स्थानिक आमदार भरतशेठ घोगावले, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे आणि संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.दरवर्षी २० मार्च रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त महाड येथे लाखो अनुयायी क्रांतीस्तंभ आणि चवदार तळे येथे अभिवादन करण्यासाठी येतात. या अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने तसेच सर्व आवश्यक तयारी ठेवावी, असे निर्देश उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.यावेळी चवदार तळे परिसरातील सार्वजनिक स्वच्छता, पाणी पुरवठा, विजेची रोषणाई, अग्निशमन यंत्रणा, पोलीस सुरक्षा, वाहतूक व्यवस्था तसेच अनुयायांसाठी निवासी व्यवस्था याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच १९ ते २१ मार्च या कालावधीत वीर, माणगाव, वामने आणि करंजडी रेल्वे स्थानकांपासून महाड शहरापर्यंत बस सेवा सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई विहार सभागृह अनुयायांसाठी खुले ठेवण्याचे निर्देशही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.चवदार तळे हे केवळ पाण्याचे साधन नसून मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे या ऐतिहासिक दिवसासाठी येणाऱ्या अनुयायांना सर्व सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मत उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केले.



# धुलवडीच्या रंगात 'विकासाचा निर्धार'

## आष्टीत पाण्यासाठी दोन माजी आमदार एकवटले; आष्टी-पाटोदा-शिरूरच्या जलप्रश्नावर रणशिंग-व्यापक जनआंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात मात्र वेगळ्याच 'विकासाच्या धुलवडी'चा साक्षीदार होण्याचा क्षण आला. मतदारसंघाच्या शाश्वत विकासासाठी आणि विशेषतः पाणी या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर ठोस तोडगा काढण्याच्या निर्धाराने माजी आमदार भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे एकत्र आले. या ऐतिहासिक बैठकीने केवळ जलप्रश्नालाच नव्हे, तर मतदारसंघातील राजकीय समीकरणांनाही नवे वळण देण्याची नांदी दिली.

मंगळवार, दि.३ मार्च रोजी आष्टी येथील भगवान महाविद्यालयात पार पडलेल्या या विशेष बैठकीस तिन्ही तालुक्यांतील शेतकरी, कार्यकर्ते व विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आष्टी, पाटोदा व शिरूर या दुष्काळग्रस्त पट्ट्यातील शाश्वत जलव्यवस्थापन कसे उभे करता येईल, यावर सखोल व अभ्यासपूर्ण मंथन झाले.

**'हार्वेस्टरमुळे बेकारी वाढेल; सिंचन हाच पर्याय' – भीमराव धोंडे**



भविष्यातील संकटाकडे लक्ष वेधताना माजी आ. धोंडे म्हणाले, बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा आहे. ऊसतोडीत हार्वेस्टरचा वापर वाढल्यास मजुरांसमोर बेकारीचे मोठे आव्हान उभे राहील. कमी पर्जन्यमानामुळे आमचे तालुके आधीच दुष्काळी आहेत. त्यामुळे सिंचन सुविधा निर्माण करून पाणी आणणे ही काळाची गरज आहे.

या मागणीसाठी सर्व संबंधित मंत्र्यांची भेट घेऊन न भूतो न भविष्यती अशी लोकचळवळ उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जनसामान्यांच्या रेट्यामुळे हा विषय अंतिम टप्प्यात यशस्वी होईल, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

'सत्तेत असलो तरी प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरू' – बाळासाहेब आजबे माजी आ. आजबे यांनी तांत्रिक व व्यवहार्य मांडणी करताना जायकवाडी धरणातून काही भागाला पाणी, खुंटेफळ प्रकल्पाचे ४ टीएमसी पाणी तसेच सीना प्रकल्पाच्या आवर्तनातून पाणी उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केली. प्रशासकीय पातळीवर योग्य पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सत्तेत असलो तरी जनहितासाठी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरायला आम्ही तयार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

**राजकीय समीकरणांना नवे वळण?**

राजकीय आखाड्यात अनेकदा वेगवेगळ्या भूमिका घेणारे हे दोन बडे नेते मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र आल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.या निर्णयामुळे भविष्यातील राजकीय व सामाजिक समीकरणे बदलतील, असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे.बैठकीच्या शेवटी, धुलवडीच्या रंगात रंगत 'विकासाचे धुलीवंदन' साजरे करत दोन्ही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना रंग लावून निर्धार अधिक दृढ केला.

**शेतकऱ्यांच्या शाश्वत पाणी योजनेवर ठोस चर्चा आष्टी, पाटोदा व शिरूर तालुके सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागे यांत्रिकीकरण (हार्वेस्टर) वाढल्यास ऊसतोड कामगारांसमोर रोजगारसंकट विविध प्रकल्पांतून दुष्काळी पट्ट्यात पाणी आणणे क्रमप्राप्त मंत्रिमंडळाशी चर्चा करून शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार धुलवडीच्या दिवशी रंगांपेक्षा अधिक ठळक ठरला तो पाण्यासाठीचा एकजुटीचा रंग – जो आष्टी-पाटोदा-शिरूरच्या भविष्यासाठी आश्वासक ठरू शकतो.**

## कुदळा येथील तरूण शेतकऱ्याची आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
**उमरी । प्रतिनिधी**



मौ. शिवाजीनगर कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथील तरूण शेतकरी बालाजी बाबुराव जाधव वय ३६ वर्षे , अल्पभूधारक या शेतकऱ्यांने सतत च्या नापिकीला आणि बॅकच्या कर्जाला कंटाळून होळी दिवशी सोमवार दि. ०२/०३/२०२६ च्या रात्री अंदाजे ९:३० वाजता विद्युत रोहित्रीच्या तारेला पकडून आत्महत्या केला असून जीवन संपविला आहे. या दुःखद घटनेमुळे वयोवृद्ध आई वडील, बायको, मुला बाळावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. या घटनेची उमरी पोलिसांना माहिती मिळताच पोलिस निरीक्षक गुट्टे यांनी सदरील घटनास्थळी जाऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे मृतदेह ताब्यात घेऊन उमरी येथिल ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करुन मंगळवारी दि. ०३/०३/२०२६ रोजी नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आला. तेंव्हा नातेवाईक व गावकऱ्यांनी बालाजी जाधव यांची सकाळी ११ वाजता मौ. शिवाजीनगर कुदळा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आली आहे. होळी सनाच्या दिवशी तरूण शेतकऱ्यांने आत्महत्या केल्यामुळे कुदळा व परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. सदरील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी आणि वयोवृद्ध आई वडील असा परिवार आहे.

## दिवंगत धनाजी शिंगाडे यांच्या स्मरणार्थ १२५ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप

दैनिक वादळ वार्ता
**शेळगाव । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या शेळगाव (ता. इंदापूर) येथील भैरवनाथ विकास सोसायटीचे व्हाईस चेअरमन छगन बापू शिंगाडे यांनी आपला मुलगा दिवंगत धनाजी छगन शिंगाडे यांच्या स्मृती जपण्यासाठी शिंगाडे परिवाराने एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या स्मरणार्थ शेळगाव येथील प्राथमिक केंद्र शाळेतील १२५ गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सागर महाराज बोराटे यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गणवेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की, शिक्षण ही काळाची गरज आहे आणि अशा प्रकारे विद्यार्थ्यांना मदत करणे हीच दिवंगत धनाजी शिंगाडे यांना खरी श्रद्धांजली ठरेल. शिंगाडे परिवाराचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे.



हा संपूर्ण उपक्रम भैरवनाथ विकास सोसायटीचे व्हाईस चेअरमन छगन बापू शिंगाडे, शेळगाव ग्रामपंचायत च्या विद्यमान सदस्या सौ. स्वाती मनोहर शिंगाडे आणि प्रगतशील बागायतदार मनोहर छगन शिंगाडे यांच्या वतीने राबवण्यात आला. आपल्या कुटुंबातील व्यक्तीच्या पश्चात त्यांच्या नावाने गावातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देऊन शिंगाडे परिवाराने एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी नारायण खराडे, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल जाधव, छत्रपती साखर कारखान्याचे माजी संचालक ॲड.लक्ष्मणराव शिंगाडे, कर्मयोगी साखर कारखान्याचे संचालक अंबादास शिंगाडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, शाळेचे मुख्याध्यापक सयाजी येवले, उपशिक्षक उमेश सुपुते, उपशिक्षिका निता माने व ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. शिंगाडे परिवाराच्या या दातृत्वाचे संपूर्ण इंदापूर तालुक्यातून कौतुक होत आहे.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड, प्रमप्रद्यम (नाहर ) विल्डिंग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी .आय. समोर जालना रोड, बीड**

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक BED/04615/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक :--------
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोदणी क्रमांक सार्वजनिक गणेश मंदिर बाबत ।
न्यासाचा पत्ता: अट धारूर रोड , केज ' बीड केज, केज
अर्जदार- छगन बाळासाहेब अंधारे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की ' सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-
(१ ) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
( २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत ( वर्णन )**

| अ. क्र | तपशील | अंदाजे मुल्य |
|---|---|---|

**(अ) जंगम मिळकत :- रोख रू. /- मात्र**
**( अक्षरी रुपये मात्र फक्त )**

**स्थावर मिळकत (वर्णन )**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AT DHARUR ROAD KAIJ | KHTE NO. 57730 | 0.27.24 | 0 | 0 | 1000000 .00 |

**(ब ) स्थावर मिळकत :- रोख रू.१००००००/- मात्र**
**( अक्षरी रुपये दहा लाख मात्र फक्त )**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही . तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २४-०२-२०२६ रोजी दिली.

**स्वाक्षरीत:**
**सार्वजनिक न्यास**
**नोंदणी कार्यालय,बीड**

## दादेगाव (हजारे) ग्रामस्थांचे विविध मागण्या साठी आमदार विलास भुमरे यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**पाचोड । प्रतिनिधी**



पाचोड दि २ सोमवार रोजी दादेगाव हजारे येथील ग्रामस्थांनी विविध प्रलंबित मागण्यासाठी आमदार विलास भुमरे यांची भेट घेऊन निवेदन दिले दादेगाव येथे मूलभूत सुविधा आणि विकास कामे तातडीने मार्गी लावावी अशी मागणी यावेळी करण्यात आली गावात मराठा समाजासाठी स्मशानभूमी नसल्याने गावातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर स्वतःच्या शेतामध्ये त्याच्यावरती अंतिम संस्कार करावे लागतात पावसाळ्यामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता नसतो त्यामुळे मृतदेहाची विटंबना होते तसेच गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून शिक्षकांचे पदे असतानाही शिक्षकांची कमतरता शाळेमध्ये भासत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक नुकसान होत आहे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तात्काळ जिल्हा परिषद शाळेसाठी एका शिक्षकाची मागणी करण्यात आली त्याचबरोबर गावांमध्ये मुख्य ठिकाणी वाचनालाय उभारण्यात यावे यासह विविध मागण्या आमदार विलास भुमरे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आले आहे यावर आमदार विलास भुमरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले तसेच गावच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करू असं त्यांनी स्पष्ट केलंय यावेळी सोसायटीचे चेअरमन आबासाहेब हजारे माजी सरपंच परसराम हजारे भाजपाचे नेते भरत थोटे शाळेतील समिती अध्यक्ष अरुण हजारे माजी शालेय समिती अध्यक्ष सचिन थोटे महेश थोटे ज्ञानेश्वर हजारे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

## नांदेड ग्रामीण व भाग्यनगर येथे जबरी चोरीच्या दोन घटना; लाखोंचा ऐवज लंपास

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जबरी चोरीच्या दोन स्वतंत्र घटना उघडकीस आल्या असून या प्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नांदेड ग्रामीण व भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून तपास सुरू आहे.

नांदेड ग्रामीण घटना : दागिने लुटून आरोपी फरार दि. ०२ मार्च २०२६ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास टापे चौक, बोंडार (ता. जि. नांदेड) येथे ही घटना घडली. फिर्यादी हे कुटुंबासह प्रवास करत असताना जेवणाचे पार्सलचे प्लास्टिक बाहेर फेकण्यासाठी गाडी थांबवली असता, दोन अनोळखी इसमांनी धाक दाखवून फिर्यादीच्या आई व मावशी यांच्या अंगावरील सुमारे दोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले व पसार झाले. या प्रकरणी फिर्यादी मो. मोतासिम नय्यर (वय २५, रा. टी. पॅराडाईज कॉलनी, वळगाव, अमरावती) यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु. क्र. १९०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि / सुनील भिसे करीत आहेत.

भाग्यनगर घटना : सहा जणांकडून ४० हजारांची लूटदि. ०१ मार्च २०२६ रोजी सायं. ४.३० ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान गिताई नगर पावडेवाडी ते सायाळ रोड परिसरात फिर्यादी प्लॉट पाहण्यासाठी गेले असता, सहा अनोळखी आरोपींनी एकत्र येऊन धाक दाखवत फिर्यादीजवळील रोख ३० हजार रुपये व १० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण ४० हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने लुटला.या घटनेप्रकरणी फिर्यादी दशरथ हनुमंत हेंडगे (वय २७, रा. भेंडेगाव, ता. लोहा, जि. नांदेड) यांच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु. क्र. ११९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१०(२), ११५ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ३.६७ कोटींचा घरकुल घोटाळा विधानसभेत धडकला!

## आ.नमिता मुंदडा यांची लक्षवेधी; दोषींवर फौजदारी कारवाईचे संकेत

## आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश





**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीतील पंतप्रधान आवास योजनेतील तब्बल ३.६७ कोटी रुपयांच्या घरकुल घोटाळ्याचा मुद्दा थेट विधानसभेत धडकला असून या प्रकरणामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा गंभीर प्रकार सभागृहाच्या निदर्शनास आणत सरकारकडे कडक कारवाईची मागणी केली.मिळालेल्या माहितीनुसार, २०२१-२२ या कालावधीत गरीब व गरजू लाभार्थ्यांसाठी केंद्र सरकारकडून पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आलेला निधी नियमबाह्य पद्धतीने वळवण्यात आल्याचे लेखापरीक्षणात उघड झाले आहे. पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होणारा निधी काही अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी नियम धाब्यावर बसवून ग्रामीण बँकेत जमा करून कंत्राटदार व संबंधितांच्या वैयक्तिक खात्यांवर वर्ग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणामुळे गोरगरिबांच्या घरकुलाच्या नावावर निधी लाटणारी टोळीच नगरपंचायतीत सक्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. घराचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक गरीब कुटुंबांना घरकुलाच्या प्रतीक्षेत ठेवून त्यांच्या हक्काचा निधीच वळवण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ प्रशासकीय दुर्लक्ष नसून गोरगरिबांची घरेही लुटणाऱ्या संगनमताची शक्यता व्यक्त केली जात आहे.या प्रश्नावर सभागृहात उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना आठ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच या घोटाळ्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येणार असून अपहार केलेली रक्कम व्याजासह वसूल करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न धुळीस मिळवणाऱ्या एकाही दोषीला पाठीशी घातले जाणार नाही, तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.या घडामोडींमुळे केज नगरपंचायत व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून या घोटाळ्यात नेमके कोण-कोण सामील आहे याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.दरम्यान, गोरगरिबांच्या घरकुलाच्या नावावर झालेल्या या घोटाळ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# प्रति देहू श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळा संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील औरंगपुर येथील श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन यावेळी पार पडले.तुकोबा,विठोबा आणि ज्ञानोबा यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता.परिसरातील अनेक गावच्या पालख्या या ठिकाणी दाखल झाल्या होत्या.पंचक्रोशी सह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने भक्त समुदाय श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावन धाम येथे दर्शनासाठी दाखल झाला होता. अल्पावधीतच प्रति देहू म्हणून ओळख निर्माण केलेले हे पावनधाम भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे.यावेळी बोलताना महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले की, पावनधाम संस्थान हे सर्वांचे आहे.संततुकाराम महाराजांच्या विचारांवर चालणारी ही संस्था आज सर्वांच्या श्रद्धेचे स्थान बनली आहे.ज्या भाविकांना देहू येथे जाता येत नाही,अशा भाविकांना येथे साक्षात तुकोबारायांचे दर्शन घेण्याची संधी मिळते.

या कार्यक्रमानिमित्त उद्योजक नामदेव इंदरराव गोरे यांनी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचक्रोशी तील स्वयंसेवकांनी तब्बल सात दिवस अहोरात्र मेहनत घेतली.

महंत ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा अत्यंत भक्ति भावाने पार पडला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून संत तुकाराम महाराजांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# संत तुकाराम महाराजांनी गाथेतून ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान सांगितले व लोकांना आत्मभान दिले-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक ५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम बीज गाथा प्रवचन,गाथावाचन करून साजरी करण्यात आली.सर्वप्रथम संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर ह.भ.प.नारायण भाऊ गायकवाड यांनी संत तुकाराम गाथेतील अभंगावर प्रवचन दिले. त्यानंतर गाथा वाचन माजी सरपंच रामराजे गायकवाड,रावसाहेब जाधव,एस.के.वैरागे यांनी केले.प्रमुख पाहुणे म्हणून बन्सीनाना गायकवाड,रामदास राऊत,अरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.अध्यक्षीय समारोपात संत तुकाराम महाराजांनी गाथेतुन ज्ञान,विज्ञान,तत्वज्ञान सांगीतले व सर्वसामान्य लोकांना आत्मभानाची अनुभुती गाथेतून दिली असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.विज्ञान कथा सादरीकरण सार्थक गायकवाड,आनंद गायकवाड, श्रुती पुंड, श्रुती गायकवाड, एस.के. वैरागे,संध्या तट यांनी केले.अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. दोन्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विधार्थी,वाचक, जेष्ठ नागरीक उपस्थित होते.

# काळाबरोबर अपडेट असणे गरजेचे-डॉ.भागीरथी गिरी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संवर्ग 'ड' पायाभूत उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम उद्घाटन सोहळा दि.५/३/२०२६ रोजी साने गुरुजी निवासी प्रा. मा.उच्च माध्यमिक विद्यालय येथे संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या या कार्यक्रमाच्या समन्वयक व मार्गदर्शिका डॉ.भागीरथी गिरी मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये या पायाभूत प्रशिक्षणाची गरज व महत्त्व समजून सांगितले. त्याचबरोबर या प्रशिक्षणाची उपयुक्तता यावर भर दिला त्यामध्ये त्यांनी सांगितले प्रशिक्षण नाही तर प्रमोशन नाही आणि आपण काम करत असलेल्या पदावर काळा अनुरूप अपडेट असणे गरजेचे आहे जगात होणारे बदल आपल्याला माहित होणे गरजेचे आहे ज्याप्रमाणे आपल्या गाडीला आपण नियमित पणे सर्व्हिसिंग करतो त्याचप्रमाणे आपल्या सेवा कालावधीमध्ये प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज चे संस्थापक अध्यक्ष अड. उद्धव अण्णा कराड साहेब यांनी उजळणी व पायाभूत प्रशिक्षणासाठी उपस्थित झालेल्या कर्मचाऱ्यांना उदाहरणे व दाखले देऊन प्रशिक्षण कशाप्रकारे गरजेचे आहे याचे महत्त्व पटवून सांगितले.प्रशिक्षण म्हणजे आपण करत असलेल्या कामात सुसूत्रता आणणे होय यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे जसे की जगात होणारे बदल आपल्याला माहीत होणे गरजेचे आहे.सध्या समाजात काळानुरूप अपडेट असणाऱ्यालाच किंमत आहे तेव्हा आपण ड प्रवर्गात असलो तरी आपला काळानुरूप मागील कामाची पद्धत व काळानुरूप बदललेली कामाची पद्धत या दोन्हींना जोडण्यासाठी अपडेट असणे आवश्यक आहे.सदर प्रशिक्षण सदर प्रशिक्षण हे दिनांक ५ मार्च २०२६ रोजी ते ७ मार्च २०२६ पर्यंत शंभर लोकांचे निवासी स्वरूपाचे आहे.यावेळी उपस्थित असलेल्या संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड मॅडम मंचावर उपस्थित होत्या. या प्रशिक्षणात सुलभक म्हणून डॉ.शशिकांत गिरी,डॉ.कविता कराड मॅडम,डॉ.राठोड, डॉ. मनीषा नागरगोजे,श्रुती लहाने,शितल बोधले, अमीर कच्छी सर हे सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका श्रुती लहाने मॅडम तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अधिव्याख्याता डॉ.प्रतिभा देशपांडे मॅडम यांनी केले सर्व मान्यवराच्या व प्रशिक्षणार्थीच्या उपस्थितीमध्ये हा प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

# शिवसेनेचे उपतालुका प्रमुख महेंद्र चाटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

शिवसेना केज उप तालुकाप्रमुख महेंद्र चाटे यांचा वाढदिवस केज येथील शिवसेना तालुका संपर्क कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मान्यवरांनी महेंद्र चाटे यांचा सत्कार करून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक,तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,युवा सेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे, शेतकरी सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष आदित्य रांजणकर,सोनीजवळा येथील सरपंच गोविंद ससाणे,युवासेना उप तालुकाप्रमुख शिवाजी गायकवाड,ज्येष्ठ नेते मालोजी नाना गलांडे पाटील,बळीभाऊ चाटे, वैजनाथ गायकवाड, सोनीजवळा ग्रामपंचायत सदस्य प्रताप वैरागे, तसेच दत्ता पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी महेंद्र चाटे यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला.

# पोलीस पाटील पदभरती-मुलाखती ७ मार्च ऐवजी ११ मार्चला होणार-गौरव इंगोले

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदभरती-२०२६ च्या अनुषंगाने दि. २२/०२/२०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती, सदर परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळापत्रक पूर्वी निश्चित करण्यात आलेले होते परंतु काही प्रशासकीय कारणास्तव दि. ७ मार्च रोजी होणारी मुलाखत दि.११मार्च रोजी होणार आसल्याची माहिती उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. प्रसिद्धी पत्रकात उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी सांगितले आहे की पोलीस पाटील पद भरती मुलाखत दि.७ मार्च २०२६ ला होणार होती. मात्र प्रशासकीय कारणास्तव सदरील ७ मार्च ची मुलाखत पुढे ढकलण्यात आली असून ,त्या मुलाखती दि.११मार्च सकाळी १०वाजल्या पासुन सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी यांच्या दालणात घेण्यात येणार आहेतरी संबंधीत सर्व उमेदवार यांना सूचित करण्यात येते कि, मुलाखतीस उपस्थित राहताना ऑनलाईन प्रणालीवर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती तसेच त्यांची एक स्वाक्षरीत सत्यप्रत सोबत आणणे बंधनकारक राहील. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येऊ शकते, याची नोंद घ्यावी.तसेच सर्व संबंधित उमेदवारांना मुलाखतीस येताना १) उमेदवारांचे उच्चतम शैक्षणिक पात्रतेसह १० वी पासुन ते पुढील शिक्षणाची सर्व यादी २) उमेदवार हा पोलीस पाटील यांचा वारस असल्यास त्याबाबतचा पुरावा ३) गृह रक्षक दल (होम गार्ड) मध्ये जाहीरात निघाल्यापासुन १०९५ दिवस (३वर्ष) कार्यरत असल्याचा पुरावा राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) क्र प्रमाणपत्र/दोन्ही चा पुरावा सादर करावा ४. अतिरिक्त अभ्यासक्रम व उपक्रमामधील प्रमाणपत्र असल्यास मुळ प्रती (extra curricular activities) सादर करावे तरी संबंधित सर्व उमेदवारांनी सुधारित दिनांका नुसार उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077